# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर   वर्ष ५ वे   अंक ७५   बुधवार दि.२४ सप्टेंबर २०२५   पृष्ठे ४   स्वागत मूल्य २ रू.


# जिल्ह्यातील ४३ रस्ते, पुलांवरून वाहतूक बंद

लातूर : प्रतिनिधी–लातूर जिल्हयात गेल्या दहा, बारा दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. सलग अतिवृष्टी होत असल्यामुळे जिल्ह्यातील मांजरा प्रकल्प, निम्न तेरणा प्रकल्प, रेणापूर, व्हटी, तिरू, देवर्जन, साकोळ, घरणी, तावरजा मध्यम प्रकल्प, १३५ लघू पाटबंधारे प्रकल्प १०० टक्के भरुन वाहत आहेत. परिणामी मांजरा, तेरणा, रेणा व तिरू नदीवरील बंधारे बॅरेजसमधून विसर्ग सूरू आहे. जिल्ह्यातील ४३ रस्ते, पुलांवरुनही पाणी वाहत असल्यामुळे हे रस्ते आणि पुलांवरुन वाहनांची वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये दि. २२ सप्टेंबर रोजी सरासरी ३५.३ मिमी पाऊस झाला आहे. सप्टेंबर महिन्यात आतापर्यंत अपेक्षित पर्जन्यमानाच्या तुलनेत (१३८.८ मिमी सरासरी) प्रत्यक्षात २२४.५ मिमी पाऊस झाला आहे. दि. १ जूनपासून आतापर्यंतचा पाऊस अपेक्षित पर्जन्यमानाच्या (६६३.८ मिमी) तुलनेत ७८३.० मिमी म्हणजेच ११८.० टक्के इतका पाऊस झालेला आहे. लातूर जिल्ह्याची वार्षिक सरासरी (जून ते सप्टेंबर) ७०६.०० मिमी च्या तुलनेत आजतागायत ७८३.० मिमी म्हणजेच ११०.९ टक्के इतक्या पावसाची नोंद झाली आहे.

निलंगा मौ. उस्तूरी ते टाकळी येथील ओढयाचे पाणी पुलावरून वाहत असल्याने वाहतूक बंद आहे. औसा तालुक्यातील वांगजी–कवळी रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने रस्ता बंद, लिंबाळा बंधा–यावरील निलंगा–कासारशिरसी रोड पाण्याखाली असल्यामूळे वाहतूक बंद. औसा तालुक्यातील हारेगाव, पोमादेवी, चिंचोली येथील पूलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद. औसा–भादा रोड हळदुर्ग येथील पूलावर पाणी साचलेले असल्याने रस्ता बंद. राजेगाव लगतच किल्लारी–राजेगाव रोडवरून पाणी वाहत असल्याने रस्ता बंद. निलंगा तालुक्यातील मौ. गुंजरगा, गुंजरगा येल्नूर रस्ता पूरामूळे बंद. औसा तालुक्यातील भेटा ते आंदोरा रस्ता पाण्याखाली आल्याने बंद. निलंगा तालुक्यातील मौ. मानेजवळगा ते शेळगी पाण्याखाली आल्याने बंद. औसा तालुक्यातील मौ. कार्ला येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने रस्ता बंद. कवठा– केज ते भादा येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने रस्ता बंद. काटेजवळगाव ते केदारपुर पुलावरून पाणी जात असल्याने वाहतूक बंद. निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे ढगफुटी पावसामुळे पानचिंचोली–दगडवाडी रस्ता बंद. कासारशिरशी ते कोराळी ता. निलंगा जाणा–या रस्त्याच्या पुलावरून पाणी वाहत असून गावाचा संपर्क तुटला आहे.

निलंगा तालुक्यातील चिंचोली भंगार ते निलंगा वाहतूक पूर्ण बंद झाली आहे. चिचोंडी ते होसुर रस्ता बंद करण्यात आला आहे. शिराढोण ते कासारशिरशी रस्ता बंद करण्यात आला आहे. चिंचोली ब. व येळनूर नदी पुलावरून पाणी वाहत असल्याने रस्ता बंद करण्यात आला आहे. गुंजरगा–तिवघाळा रस्ता तेरणा नदीच्या पुरामुळे बंद करण्यात आला आहे. सावरी वडाच्या पुलावरून पाणी जात असल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. लातूर – कळंब रोड पाणी वाहत असल्याने रस्ता बंद. तुळजापूर ते औसा उजनी तेरणा नदीच्या पुरामूळे पाणी आल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. चिंचोली येथे पुलावर पाणी आल्यामुळे मुरुड गातेगाव बस चिंचोली येथून परत बोलवण्यात आली आहे. अंबाजोगाई गरसुळी बस वांगदरी येथे पुलावर पाणी आल्यामुळे परत बोलवण्यात आले आहे.औसा – मुरूड रस्ता बंद करण्यात आला आहे. औसा–मातोळा–माकणी रस्ता बंद करण्यात आला आहे. औसा –हसलगण –माकणी रस्ता बंद करण्यात आला आहे.

## शेतकरी राजा पुन्हा कसा उभा राहील याचा सरकारने विचार करावा; शरद पवारांचे आवाहन

मराठवाड्यात दुष्काळी भागातही पावसानं झोडपलं असून अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली. यात शेतीपिकांचे मोठे नुकसान झाल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. राज्यात सुरू असलेला पाऊस आणि नुकसानीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. केंद्र सरकारकडून राज्याला मदत करण्यासाठी ज्या योजना आहेत ते वापरून नुकसानभरपाई करणे गरजेचे असल्याची मागणी शरद पवार यांनी केली आहे.

नेमकं काय म्हणाले शरद पवार? राज्यात यंदा अभूतपूर्व पाऊस पडला आहे. जे जिल्हे दुष्काळासाठी प्रसिद्ध आहेत त्या जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. अतिवृष्टीचा परिणाम शेतकऱ्यांच्या संसारावर झाला आहे. सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणावर होतं. याशिवाय इतर पिकंसुद्धा मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. पण त्यात सोयाबीनचे पीक भरवशाचे पिक असते. पिकं कुजून गेली आहेत तर सोयाबीन उद्धस्त झालं.

## बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्या- खा.रजनीताई पाटील

केज/प्रतिनिधी मागील पंधरा दिवसापासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची शेती मातीसगट वाहून गेली आहे. जनावरे गुरे वाहून गेली आहेत. बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट ५० हजार रु शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजारांची मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सध्या बीड जिल्ह्यात सर्वच तालुक्यात पावसाने मोठे नुकसान झाले असुन सोयाबीन, कापुस पुर्णतः हातातुन गेले आहे. नदीकाठचे घरे, जनावरे वाहुन गेली असुन प्रत्येक गाव या अतिवृष्टीने बाधित झाले आहे कोणतेही पंचनामे न करता जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची अर्थिक मदत तात्काळ द्यावी सद्य स्थितीत जिल्ह्यातील सर्वच नद्या आपले पात्र सोडुन १ ते १.५ कि.मी क्षेत्रातुन वाहत आहेत त्यामुळे अतोनात नुकसान झाले आहे.अनेक गावात पाणी शिरले असुन जनावरांचे गोठे वाहुन गेले असून पशुधनाची देखील जिवीत हानी झाली आहे. त्यामुळे आपण सबंध जिल्हा ओला दुष्काळ म्हणून जाहिर करावा व ज्याची घरे, जनावरे वाहुन गेली त्यांना वेगळी वेगळी मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे. अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. करून शेतकऱ्यांना सरसगट मदत मिळाली पाहिजे थेट मुख्यमंत्र्यांकडे त्यांनी याबाबत मागणी करून संवाद साधला आहे. पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही



केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल. त्यामुळे प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा. रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळेपर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे सांगितले.

## मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक घ्या!

**काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार धिरज देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी:: ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या**

लातूर :– राज्यात प्राथमिक अंदाजानुसार अतिवृष्टीमुळे २६ लाख ३ हजार हेक्टरवरील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. यात सर्वाधिक नुकसान मराठवाड्यात झाल्याची नोंद आहे. सततच्या अतिवृष्टीमुळे, ठिकठिकाणी झालेल्या ढगफुटीमुळे बळीराजा अक्षरशः उद्धस्त झाला आहे. त्यामुळे तातडीने मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी व मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट भरीव मदत द्यावी अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी केली दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठवाड्याला यंदा पावसाने झोडपून काढले आहे. निसर्गाचा हा महाप्रलय आहे. पहिल्यांदाच मराठवाड्यात सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे. पावसाने हाहाकर माजवल्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. त्यामुळे काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक घेऊन ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यात मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. लातूर, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड यासह अन्य जिल्ह्यात पूरस्थिती आहे. अनेक गावात पाणी शिरले आहे. शेतकऱ्यांची उभी पीके पाण्यात गेली आहेत. अनेकांच्या शेतात कमरेइतके पाणी पहायला मिळत आहे. त्यामुळे शेतीलाच तलावाचे स्वरूप आले आहे. मराठवाड्यात अनेक भागात पावसाने घातलेल्या या हाहाकारामुळे ऐन सणांच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या संसाराची राखरांगोळी झाली आहे. याकडे काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधून घेतले आहे आतापासूनच दीर्घकालीन उपाय आवश्यक ::: मराठवाड्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती आहे. पूर ओसरल्यानंतर त्या भागात रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे आरोग्य विभागाला सतर्क करणे गरजेचे बनले आहे. याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घ्यायला हवा. पुरामुळे अनेकांचा संसार वाहून



गेला आहे. अशांचा संसार पुन्हा उभा करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. पशुधन, अवजारे, स्प्रिंकलर, पाईप, मोटारी, पत्रे या वस्तूही पुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. याबाबतही सरकारने ठोस निर्णय घ्यायला हवा. अतिवृष्टी आणि ढगफुटीमुळे खरीप हंगाम वाया गेला. आता रब्बी हंगामही गेलाच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा उभं कसं करता येईल हे सरकारने पाहायला पाहिजे. यंदासारखी अतिवृष्टी मराठवाड्यात पुन्हा झाली तर त्याला तोंड कसं देता येईल, नुकसान कसे टाळता येईल याचाही सरकारने गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. म्हणून दीर्घकालीन उपायांसाठी मंत्रिमंडळाची बैठक मराठवाड्यात होणे आवश्यक आहे असे काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले

## माणुसकी जागी ठेवणं नक्कीच आपल्या हातात; सुनेत्रा पवारांचा राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसाठी महत्वाचा संदेश म्हणाल्या

राज्यात पावसाने अक्षरश: कहर केला आहे. राज्यातील सर्वच जिल्ह्यांत धुव्वाधार पाऊस झाला आहे. मराठवाडा आणि विदर्भात तर पावसाने रौद्र रुप घेतल्याचं पाहायला मिळत आहे. या भागात मोठा पाऊस झाल्याने जनजीवन पूर्णताः विस्कळित झालं आहे. पावसामुळे नद्या, नाले तुडुंब भरून वाहत असून अनेक नद्यांना पूर आला आहे. यामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे. ज्या भागात पूरस्थिती आहे, तिथे एनडीआरएफीच्या पथकाकडून बचाव मोहिम राबविली जात आहे.

बळीराजाला देखील पावसाचा मोठा तडाखा बसला आहे. बळीराजावर अस्मानी संकट कोसळलं असून, ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी शेतकरी करत आहेत. या राज्यातील परिस्थितीवर आणि ओढावलेल्या अस्मानी संकटावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुनेत्रा पवार यांनी फेसबुक पोस्ट शेअर करत पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना अवाहन केलं आहे.

माझ्या लातूर, सोलापूर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील इतर पूरग्रस्त जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांनो व पदाधिकाऱ्यांनो, ही अतिवृष्टी आपल्या हातात नसली तरी, आपल्यातील माणुसकी जागी ठेवणं नक्कीच आपल्या हातात आहे, असा महत्वाचा संदेश सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना दिला आहे. आज आपल्या भागात पावसाने थैमान घातले आहे. या संकटात आपल्या बळीराजाच्या डोळ्यादेखत त्याची मुकी जनावरं वाहून जात आहेत, ही बातमी ऐकून मन सुन्न झालं आहे. शेतकऱ्यासाठी त्याचं जनावर हे केवळ एक प्राणी नसतो, तर त्याच्या कुटुंबाचा सदस्य असतो.

त्याचं हे नुकसान कधीही भरून न येणारं आहे. अशावेळी त्यांच्या डोळ्यांतील पाणी पुसणं, हे आपलं पहिलं कर्तव्य आहे, असंही सुनेत्रा पवार म्हणाल्या आहेत.

## भादा सर्कलमधील नुकसानग्रस्त शेतीची पाहणी; व्यथा जाणून आ. कराड यांनी जनतेला दिला धीर

लातूर : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कलमधील विविध गावांना भेटी देवून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या शेतीची त्याचबरोबर विविध ठिकाणच्या लोकवस्तीची पाहणी केली. शेतकरी, ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या आणि राज्यातील महायुतीचे शासन आपल्या पाठीशी आहे नुकसानग्रस्तांना निश्चितपणे सरसकट मदत केली जाईल असा धीर दिला.

गेल्या काही दिवसापासून लातूर ग्रामीण मतदार संघातच नव्हे तर सबंध जिल्हाभरात यापूर्वी अशी विदारक परिस्थिती कधीच उद्भवली नव्हती. निसर्ग अक्षरशः कोपला आहे. नदी नाल्या ओसांडून वाहत आहेत. मुसळधार पावसाने आणि सततच्या अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. हाताशी आलेली सोयाबीन, तूर, मूग, ऊस या पिकांसह अनेकांच्या फळबागा पाण्यात गेल्या, शिवारातील पिकांच होत्याचं नव्हतं झालं आहे. हे अभुतपुर्व नुकसान असून शेतात जिकडे बघावे तिकडे पाणीच पाणी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तर नदी नाल्याकाटच्या आणि सखल भागातील अनेक वस्त्यातील घरात पाणी शिरून अनेकांचे मोठे नुकसान झाले आहे.

मुसळधार आणि सततच्या पावसामुळे नुकसानीत आलेल्या औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील वानवडा, शिंदाळा, टाका, बिरवली, वरवडा, येल्लोरीवाडी, कोरंगळा, लखनगाव, हळदुर्ग, भादा यासह विविध गावांचा लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी दौरा करून ठिकठिकाणीच्या नुकसानग्रस्त शेतीची, पाणी शिरलेल्या घरांची आणि ओढे नाल्यावरील नुकसान झालेल्या लहान मोठ्या पुलाची आणि रस्त्याची पाहणी केली. शेतकऱ्यासह नागरिकांनी दिलेल्या निवेदनाचा स्वीकार केला. या पाहणी दौऱ्यात औसा तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास अधिकारी अनंतकुमार मिरगणे, तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय हाके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शिंदे, जि.प. बांधकाम विभागाचे सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक महावीर जाधव भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, भागवतराव सोट, नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष उद्धव काळे, पद्माकर चिंचोलकर, राजकारण साठे, रविंद्र पाटील, लिंबराज सुर्यवंशी, महादेव गुरुशेट्टे यांच्यासह जलसंधारण, बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व इतर अधिकारी कर्मचारी होते.

पाहणी दौऱ्याच्या निमित्ताने ठिकठिकाणी शेतकरी आणि नागरिकांशी संवाद साधताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हाता–तोंडाशी आलेला घास निसर्गानं हिरावला आहे. शेतकरी अन् सर्वसामान्य नागरिकही गंभीर संकटाच्या कचाट्यात सापडले. सरकार आपल्या पाठीशी असून जिल्ह्यात 'ओला दुष्काळ' जाहीर करावा अशी आमची मागणी आहे. झालेल्या नुकसानपोटी सर्व



शेतकर्यांना सरसकट आर्थिक मदत देण्यात यावी याबाबत मी स्वतः मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना आजच्या मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी बोललो आहे. शंभर टक्के नुकसान भरपाई देण्याचे काम शासन करणार असून शासनाच्या मदतीपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी काळजी घेऊन सर्वांच्या नुकसानीचे पंचनामे करावेत अशा सूचना त्यांनी दिल्या.

पुढील दोन–तीन दिवसात आणखी पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. नागरिकांनी अधिक सतर्कता बाळगणे आवश्यक आहे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी नैसर्गिक नुकसान कसेही भरून काढता येईल मात्र एखादी जीवित हानी झाली तर कशानेही भरून निघणार नाही. तेव्हा नदी नाल्याच्या पुरात कोणीही जाण्याचा प्रयत्न करू नये, पावसात शक्यतो झाडाखाली थांबू नये, सखल भागात राहणाऱ्या नागरिकांनी सावधानता बाळगावी आपला जीव आणि पशुधन सुरक्षित कसे राहील यासाठी काळजी घ्यावी असेही आवाहन त्यांनी केले.

आ. कराड यांच्या पाहणी दौऱ्यात त्या त्या गावातील फुलचंद अंधारे, लिंबराज सोमवंशी, राजेंद्र घोडके, अशोक वीर, बबन बंडगर, ज्योतीराम गोरे, राजूनाना गोरे, प्रशांत पाटील, गोरख बनसोडे, योगेश लटूरे, दीपक मानधने, सतीश कात्रे, अंगद गरड, प्रदीप शिंदे, गुणवंत करंडे, रामेश्वर गवळी, मार्तंड चव्हाण, शुभम देशमाने, संजय करडे, राजू कांबळे, प्रवीण चव्हाण, अमित पाटील, सतीश काळे, बालाजी शिंदे, अच्युत ईरपे, सुधाकर खडके, शिवरत्न वाले, बालाजी पाटील, किशोर ईरपे, पांडुरंग शिवलकर, सुरज भोसले, बाबासाहेब घोडके, सुनील घोडके, मधुकर जाधव, श्रीपती आळणे, गोपाळ पाटील, श्रीराम सावळे, व्यंकट सावळे, सुरेश जंगले, सहदेव वाघमारे, बंडू तात्या जंगले, राहुल कदम, शंकरराव कदम, बलभीम खोजे, मकरंद कदम, बाळासाहेब सूर्यवंशी, नेताजी भोसले, राम पटणे आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह शेतकरी नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने होते.

# संपादकीय

## सामर्थ्य नारीशक्तीचे !

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. यावेळी अर्ध्याहून अधिक जिल्हा परिषदांचा कारभार महिलांच्या हाती असेल. नवरात्रीनिमित्त या बदलाबद्दल हे धावते चिंतन! मृणालिनी नानिवडेकर शक्तीच्या पूजनाचे दिवस सुरू झाले आहेत. होय, नवरात्र साजरे होतेय. मंदिरे गजबजून गेली आहेत. भाविकांच्या रांगा लांब होऊ लागल्या आहेत. देवीचा अंश असलेल्या महिलेतील दैवी शक्तीला पूजले जाते आहे. संस्कृती परंपरेने भारलेल्या या वातावरणात लहान-थोर मनोभावे 'शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते' म्हणत असताना राजकारण्यांच्या पूजेतही मतांचा प्रसाद मिळावा ही मनोकामना आहेच. नवरात्रीत गरबे होतील, अन्नछत्रे उघडली जातील. देवी जागरण होईल आणि त्याबरोबरीने मतांचा जोगवा मागितला जाईल. महाराष्ट्र निवडणुकांना सामोरा जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नागरिकांसाठी सर्वात महत्त्वाच्या; तर राजकारण्यांसाठी भविष्याचा पाया रचणार्या! पुढचे चार-पाच महिने धूमशान होणार आहे. पडद्यामागे मोठ्या घडामोडी सुरू आहेत. वॉर्डांच्या सीमा ठरताहेत. नात्यात आखल्या गेलेल्या सीमा धूसर करण्यासाठी भाऊ भाऊ झटत आहेत. मतयंत्रे तयार होताहेत. महानगरपालिका निवडणुकांची सर्वाधिक चर्चा होईल. मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर, कोल्हापूर या राज्यातील बड्या महापालिका. तेथील निवडणुकांची पूर्वतयारी निश्चित व्हायची आहे. आरक्षणे ठरायची आहेत. जिल्हा परिषद निवडणुकांची बेगमी मात्र निश्चित झाली आहे.

महाराष्ट्रातील ३४ जिल्हा परिषदांत नवे कारभारी निवडले जाणार आहेत आणि त्यातील १८ जिल्हा परिषदांच्या प्रमुखपदी महिला बसणार हे निश्चित आहे. लोकसभेने नारी शक्ती वंदन विधेयक पारित केल्यानंतर आता पुढच्या मतदारसंघांच्या फेरसीमांकनांतर होणार्या निवडणुकांत ३३ टक्के जागा महिलांसाठी आरक्षित असतील. जनगणना व्हायची आहे, मतदारांच्या संख्येची निश्चित माहिती जनगणनेतून मिळेल. त्यानंतर मग मतदारसंघ तयार होतील. लोकसंख्या नियंत्रणाबाबत उत्तम कामगिरी नोंदवणार्या दक्षिणेतील राज्यांचा तोटा होईल आणि उत्तरेतील बेलगाम कारभाराचा अकारण फायदा, असे चित्र सातत्याने समोर येते आहे. सूत्र कोणतेही का ठरेना, महिलांचे प्रतिनिधित्व वाढणार हे निश्चित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांत ३३ टक्के आरक्षण यापूर्वी कधीचेच लागू झाले आहे. आता त्याच धर्तीवर विधानसभा आणि राज्यसभेत आरक्षण लागू होणार असताना लोकशाहीचे प्राथमिक शिक्षण देणार्या जिल्हा परिषदांमध्ये महाराष्ट्रात महिला राज निर्माण होणार हे महत्त्वाचे आहे. या महिला प्रमुख जनतेचे प्रश्न कसे समजून घेतात, ते सोडवण्यासाठी काय करतात, यावर त्यांचे व्यक्तिगत भवितव्य आकार घेईलच; पण महिलांचा संजीवक स्पर्श त्या त्या जिल्हा परिषदेचे आराखडेही बदलून टाकू शकेल. घटनादुरुस्तीने ज्याप्रमाणे महिलांना आरक्षण दिले, त्याचप्रमाणे अन्य एका घटनादुरुस्तीने पंचायत राज व्यवस्था बळकट व्हावी यासाठी गावपातळीवर केंद्रीय अनुदानेही सुरू केली. आज जिल्हा परिषदांनाच नव्हे तर पंचायत समित्यांनाही मोठ्या प्रमाणात निधी मिळतो आणि त्यातून विकासाची बरीच कामे मार्गी लावता येतात.

अपघाताने राजकारणात आलेल्या आणि यशस्वी झालेल्या महिलांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे. महाराष्ट्राचेच उदाहरण घ्यायचे तर आज केंद्रीय मंत्री असलेल्या रक्षा खडसे अशाच एका दुर्दैवी प्रसंगामुळे राजकारणात आल्या. ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचा मुलगा निखिल अकाली गेला आणि मग त्याच्या दुर्दैवी ठरलेल्या पत्नीला रक्षा यांना खडसे यांनी राजकारणात आणले. पदार्पणातच निवडणुकीत यशस्वी होऊन रक्षा या जिल्हा परिषदेत शिरल्या तेव्हापासूनच त्या कारभाराकडे लक्ष देऊ लागल्या. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या पत्नी शालिनी यांनीही नगर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषवताना अनेक लोकोपयोगी कामे सुरू केली. शिर्डी मंदिरात साईचरणी वाहिलेल्या फुलांचे निर्माल्य तसेच वाया जाई. शालिनी यांनी त्यात लक्ष घालून त्यापासून उदबत्ती तयार करणे सुरू केले. आता हा प्रयोग अन्य देवस्थानांतही राबवला जात आहे. महिला बदल घडवून आणतात याची उदाहरणे वाढताहेत.

पुढच्या पाच-सहा महिन्यांत अर्ध्याहून अधिक जिल्हा परिषदांत निवडणुकीनंतरचे पहिले अडीच वर्षे महिला प्रमुख असतील. अंबा मातेचा निवास असलेल्या कोल्हापुरात जिल्हा परिषद अध्यक्ष सर्वसाधारण गटातील महिला असेल. सांगली, ठाणे, धाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली याही जिल्हा परिषदांत महिला अध्यक्ष. ओबीसींसाठी राजकीय आरक्षण मोलाचे ठरले आहे. रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, नांदेड या जिल्हा परिषदांची प्रमुख ओबीसी महिला असेल; तर बीड,चंद्रपूरची अनुसूचित जातीतील महिला कारभार बघेल आणि अकोला, वाशिम आणि अहिल्यानगर या ठिकाणी अनुसूचित जमातीतील महिला प्रमुख असेल. महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्षांना किमान या १८ ठिकाणी सक्षम महिला चेहरे समोर आणायचे आहेत. राजकारण स्पर्धात्मक असल्याने प्रत्येक नेता सत्ता घरात राहावी यासाठी कुटुंबातल्या महिलेलाच संधी देणे पसंत करतो. राखीव जागांच्या राजकारणात अन्य समाजातील चेहरे समोर आणावे लागतात. पण कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जातेच. पूर्वी महिला सरपंच असली तर तिचा पती गाडीवर सरपंच पती असा बोर्ड मिरवत असे. झेंडावंदन ती महिला पदाधिकारी बघे आणि कारभार पती करायचा! आता असे चालत नाही. लाडक्या बहिणींनी निवडणुकीचे निकाल बदलले. महाराष्ट्रात एकूण मतदार ९.५ कोटी आहेत. त्यातील ४.९ कोटी पुरुष तर ४.६ कोटी महिला आहेत. मतदार नोंदणीसाठी महिलांनी यावेळी गर्दी केली. महिलांच्या मतदानाची टक्केवारीही वाढली. लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीत अख्ख्या देशात केवळ ४५ महिला उमेदवार होत्या, आता ही संख्या हजारात पोहोचली असेल. 'हम भारत की नारी है, फूल नही चिंगारी है' ही भारतातील महिलांची आवडती घोषणा. पुरुषप्रधान संस्कृतीत ही घोषणा कित्येक वर्षे लोकप्रिय ठरली. गेल्या काही वर्षांत त्यात आमूलाग्र बदल झाले. हे बदल सकारात्मक आहेत आणि त्यामागची कारणे राजकीय आरक्षणासारख्या काही निर्णयांत दडलेली आहेत. महिला सजग झाल्या आहेत. त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव होऊ लागली आहे आणि पुरोगामी कायद्यांमुळे अन्यायावर फुंकर घालणारे वातावरण सभोवताली निर्माण होते आहे हे आश्वासक आहे. अशा परिस्थितीत चांगले चेहरे निवडून येतील आणि समाजाला पुढे नेतील ही अपेक्षा.

# जगाच्या पाठीवर निधर्मी राष्ट्र भारत

आपला भारत देश निधर्मी राष्ट्र आहे. या देशात कोणत्याही एका धर्माचे लोक राहत नाहीत. या देशात हिंदू ,मुस्लिम ,शीख ,बौद्ध ख्रिश्चन ,पारशी इत्यादी विविध धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहेत. म्हणूनच आपल्या भारत देशाला निधर्मी राष्ट्र म्हणून संबोधित असतात. आपल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधाना मध्येच नमूद केलेले आहे की येथील प्रत्येकाला आपापल्या धर्मानुसार पूजाअर्चा करण्याचा अधिकार आहे. कोणीही एकमेकाच्या धर्मात ढवळाढवळ करणार नाही. प्रत्येकाला आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याचा पूर्ण अधिकार आहे. आपल्या संविधानामुळेच आपल्या देशात धर्माधर्मात कधी वादविवाद होत नाहीत. प्रत्येक धर्माचे वेगवेगळे सण उत्सव साजरे केले जातात. जसे की हिंदूंचे गुढीपाडवा , नागपंचमी , दहीहंडी, गौरीगणपती नागपंचमी दहीहंडी गौरी गणपती, दसरा , दीपावली इत्यादी .तसेच मुस्लिम धर्माचे रमजान ईद, बकरी ईद , ईद ए मिलाद इत्यादी, ख्रिश्चन धर्माचा नाताळ , पारशी धर्माचे न्यू पारशी इयर असे वेगवेगळ्या धर्माचे वेगवेगळे सण आणि उत्सव साजरे केले जातात. एका धर्माचे लोक दुसऱ्या धर्माच्या उत्सवात आनंदाने सहभागी होऊन त्या सणाचा लाभ घेतात. त्यामुळे एका धर्माचे लोक दुसऱ्या धर्माला महत्त्व देतात. सर्वधर्मसमभाव ही भावना त्यामुळे दिवसे दिवस वाढत असलेली आपणास ठिकठिकाणी पहावयास मिळत असते.आणि त्यामुळे आपल्या देशात कधी जाती दंगली घडत नाहीत. सर्व धर्माचे रितीरिवाज आपले संविधानाने एका धाग्यात गुंफून केल्याचा भास होत असतो. आपल्या शेजारच्या देशामध्ये धर्माधर्मा मध्ये जाती-जातीमध्ये भांडणे होतात तशी येथे होत नाहीत. कारण प्रत्येकजन येथे गुण्यागोविंदाने अनेक वर्षापासून राहत आलेला आहे. सर्वधर्म समभाव पद्धतीने आपण प्रत्येक धर्मातील सण उत्सव आनंदाने साजरे केले तर अनेकातून एकता नांदत असलेली दिसून येते.

त्यासाठी प्रत्येक भारतीयांनी वर्णभेद, जातीभेद ,धर्मभेद, लिंगभेद बाजूला ठेवून प्रत्येक धर्माच्या सणात उत्साहात भाग घेऊन त्या त्या धर्माच्या लोकांच्या मनात अधिक अधिक उत्साह निर्माण करून तो आपलाच सण आहे समजून वागले तर आपल्या देशी बांधवांची एकी कायम राहील. त्यामुळे शेजारील शत्रू राष्ट्र आपल्याकडे वाईट नजरेने पाहणार नाही. आपले राष्ट्र कसे एकसंग राहील याचा प्रत्येक भारतीयांनी प्रयत्न केला पाहिजे. त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येकाने बीड जिल्ह्यातील धोंडराई या गावासंबंधीचा व्हिडिओ एकदा समाज माध्यमावर पाहण्यास मिळाला होता.

तेथील हिंदू व मुस्लिम बांधव हे गेल्या काही वर्षापासून एकत्र सण असा साजरा करतात की ज्यावेळी मुस्लिमांचा रमजान ईद असलेल्या वेळी सर्व हिंदू बांधवांना शिरखुर्मा हिंदू बांधवांना वाटप करत असतात. तसेच हिंदू बांधव सुद्धा दिपवाळीला फराळ म्हणून सर्व मुस्लिम बांधवांना मशिदी मध्ये फराळाचे जेवण एकत्र देत असतात. हिंदू मुस्लिमांची ही एकी प्रत्येक गावा गावात निर्माण झाली पाहिजे. कोणताही धर्म हा वाईट नसतो. प्रत्येक धर्म नेहमी चांगलेच शिकवत असतो. हिंदू - मुस्लिम धर्माचे आदर्श गाव म्हणून बीड जिल्ह्यातील धोंडराई गाव ओळखले जात आहे. सर्व भारतीयांनी त्या गावाचा आदर्श घेण्याची गरज आहे. त्यामुळे धोंडराई गावच्या सर्व ग्रामस्थांचे कोणत्या शब्दात आभार मानावे तेच कळत नाही. अशीच एकी प्रत्येक गावागावात निर्माण झाली पाहिजे. तरच शेजारी शत्रू राष्ट्र आपल्याकडे करड्या नजरेने पाहू शकणार नाहीत. ही काळ्या दगडावरची रेष आहे अशाच प्रकारे भुईज तालुका वाई जिल्हा सातारा येथील गणपती उत्सवाच्या कार्यक्रमात सुद्धा असाच हिंदू मुस्लिम यांच्या एकीचा अनुभव आलेला आठवतो .त्या ठिकाणी हिंदू बांधवांनी सर्व मुस्लिम बांधवांना गणपतीची आरती झाल्यानंतर सर्वांना मुस्लिम बांधवांना मोदकाचे वाटप करण्यात आले तर त्याचवेळी सर्व मुस्लिम बांधवांनी सर्व हिंदू बांधवांना शिरखुर्मा वाटण्यात आला.

त्यावेळी एका हिंदू बांधवाने एक हिंदू मुस्लिम भाई भाई हे पूर्वी ऐकलेले गीत सादर करून कार्यक्रमाचे अधिकच शोभा वाढवली.

हिंदू मुस्लिम भाई भाई
हिंदू मुस्लिम भाई भाई
दोनो का ईश्वर एक है
एक तरफ मंदिर है
एक तरफ मशीद है
एक तरफ राम है श्र
एक तरफ रहीम है श्र
राम रहीम नाम अलग है श्र
लेकिन दोनो के अक्षर एक है श्र
मंदिर मस्जिद नाम अलग है श्र
लेकीन दोनोका पत्थर एक है श्र
एक तरफ शेंडी है श्र
एक तरफ दाढी है श्र
शेंडी दाढी नाम अलग है श्र
लेकीन दोनो के बाल एक है श्र
एक तरफ धोती है श्र
एक तरफ लुंगी है श्र
धोती लुंगी नाम अलग है श्र
लेकीन दोनो का धागा एक है श्र
एक तरफ मोदक है श्र
एक तरफ शीरखुर्मा है श्र
मोदक शीरखुर्मा नाम अलग है श्र
लेकिन दोनो मे शक्कर एक है श्र

यावरून सर्व भारती बांधवांना आव्हान करण्यात येते की सर्वांनी बीड जिल्ह्यातील धोंडराई या गावाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला तर हिंदू-मुस्लिम ही दरी आपल्यामध्ये राहणार नाही हे आपणास भविष्यात जाणवेल. आपण फक्त आणि फक्त भारतीय आहोत याचा अभिमान वाटत राहील. निधर्मी देश म्हणून जगाच्या पाठीवर भारत एकमेव देश आहे याचा आम्हा भारतीयांना चंद्र सूर्य असे पर्यंत कायम अभिमानच वाटत राहील. म्हणूनच म्हटलं जातं जगाच्या पाठीवर निधर्मी राष्ट्र भारत

*************

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न.७५८८५६०७६१

# अरबपती आणि शेतजमीन खरेदी

जर मोठ्या प्रमाणावर शेतीची जमीन कार्बन क्रेडिट निर्मितीसाठी वापरली जाऊ लागली, तर अन्नधान्य उत्पादन घटण्याची शक्यता आहे. परिणामी अन्नधान्य आयात करण्यावर देशाला अवलंबून राहावे लागेल.

गेल्या काही वर्षांत जगातील प्रचंड संपत्ती असलेले उद्योगपती, बहुराष्ट्रीय संस्थांचे प्रमुख तसेच मनोरंजन क्षेत्रातील नामवंत कलाकार मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी खरेदी करू लागले आहेत. भारतातील अलीबागसारख्या किनारी भागांपासून अमेरिकेतील गव्हाच्या पट्ट्यापर्यंत, आफ्रिकेतील उघड्या माळरानांपासून दक्षिण अमेरिकेतील रेनफॉरेस्टपर्यंत हा प्रकार दिसू लागला आहे. अनेकांना हे साधे गुंतवणूक धोरण वाटेल, तर काहींना ही श्रीमंतांची विलासी हौस भासेल. परंतु या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी आहे ते कार्बन क्रेडिटचे अर्थकारण.

कार्बन क्रेडिट म्हणजे सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, हे एक प्रमाणपत्र असून ते एखाद्या प्रकल्पाने कार्बन डायऑक्साइड किंवा त्यासमान हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी केले असल्याचे दर्शवते. कार्बन क्रेडिट खरेदीविक्रीसाठी आता जागतिक पातळीवर स्वतंत्र बाजार तयार झाले आहेत. ज्यांचे कारखाने, विमानतळे, मोटारगाड्या सतत धूर सोडत आहेत, त्यांना प्रत्यक्ष प्रदूषण कमी करणे महागडे ठरते. म्हणूनच ते कार्बन क्रेडिट विकत घेऊन आपल्या हिशेबात प्रदूषणाचा समतोल साधतात. याउलट ज्यांनी जंगल संवर्धन, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा वा सेंद्रिय शेती केली आहे त्यांना कार्बन क्रेडिट मिळते. हे क्रेडिट ते कंपन्यांना विकतात. विसाव्या शतकाच्या अखेरीस आणि एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला हवामान बदलाचे दुष्परिणाम स्पष्ट होऊ लागले. अंटार्क्टिकातील हिमनग वितळू लागले, समुद्रपातळी वाढू लागली, चक्रीवादळांची तीव्रता वाढली, पिकांचे नुकसान वाढले. जागतिक समुदायाने या संकटाकडे गांभीर्याने पाहिले आणि विविध परिषदांमधून करार केले. क्योटो करारापासून पॅरिस करारापर्यंत सर्वत्र प्रदूषण कमी करण्याचे लक्ष्य ठरवले गेले. पण प्रत्यक्षात उत्पादन थांबवणे किंवा कारखान्यांची धूर उत्पन्न करणारी यंत्रणा बदलणे अत्यंत खर्चिक होते. परिणामी एक पर्यायी यंत्रणा निर्माण झाली. त्यानुसार प्रदूषण कमी करण्याचे कार्य जिथे होईल, त्याचे श्रेय प्रमाणपत्राच्या स्वरूपात इतरांना विकता येईल. अशा रीतीने कार्बन क्रेडिटचा व्यवसाय जन्माला आला.

पण हा व्यवसाय जसा विस्तारू लागला तसतशा त्यातील उणिवा आणि गैरवापरदेखील समोर येऊ लागले. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या प्रकल्पांमुळे निर्माण होणारे प्रदूषण रोखण्याऐवजी कार्बन क्रेडिट खरेदी करून कागदोपत्री 'ग्रीन' दिसू लागल्या. विमान कंपन्या हा त्याचा उत्तम नमुना आहे. प्रत्येक वर्षी कोट्यवधी टन कार्बन आकाशात सोडणार्या विमान उद्योगाने खरोखर प्रदूषण कमी करायचे ठरवले तर संपूर्ण तंत्रज्ञान बदलावे लागेल. हे अत्यंत खर्चिक आहे. त्यामुळे त्यांनी सहजसोपा मार्ग निवडला. जिथे वृक्षलागवड प्रकल्प दाखवला गेला आहे तिथून कार्बन क्रेडिट खरेदी करा व अहवालात लिहा की आमची कंपनी पर्यावरणपूरक आहे. प्रत्यक्षात मात्र आकाश धुराने भरलेलेच राहते.

आजघडीला शेतजमीन ही अन्नधान्योत्पादनापेक्षाही कार्बन क्रेडिट निर्माण करण्यासाठी सर्वात उपयुक्त साधन बनत आहे. पृथ्वीवरील सर्वांत मोठे कार्बन साठवणारे स्रोत म्हणजे जंगल आणि माती. झाडे हवेतील कार्बन शोषून घेतात, तर जमिनीतील सेंद्रिय घटक कार्बन दीर्घकाळ साठवून ठेवतात. योग्य शेतीपद्धतींमुळे हा कार्बन दशके किंवा शतके जमिनीत साठून राहू शकतो. त्यामुळे जितकी जास्त जमीन ताब्यात येईल तितकी जास्त कार्बन क्रेडिट मिळवण्याची संधी निर्माण होते. परिणामी कार्बन क्रेडिट विकून अब्जावधींची कमाई करता येते. पण याचा थेट परिणाम ग्रामीण भागांवर होत आहे.

लहान शेतकर्यांना आपल्या गरजांमुळे, कर्जामुळे किंवा बाजारपेठेतील दबावामुळे जमिनी विकाव्या लागतात. ती जमीन मोठ्या गुंतवणूकदारांच्या हातात जाते. प्रत्यक्षात ती जमीन पारंपरिक शेतीसाठी वापरली जात नाही, तर कार्बन क्रेडिट निर्माण करण्यासाठी वापरली जाते. यामध्ये झाडे लावण्याचे प्रकल्प राबवले जातात, पण स्थानिक शेतकरी मात्र बेकार होतात. एकीकडे कार्बन क्रेडिटमधून श्रीमंतांना फायदा होतो, तर दुसरीकडे ग्रामीण समाज आपली पारंपरिक उपजीविका गमावतो.



हा प्रश्न केवळ भारतापुरता मर्यादित नाही. आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि आशियातील अनेक देशांमध्ये ही प्रवृत्ती स्पष्ट दिसते आहे. मोठे उद्योगसमूह स्थानिक जमिनी विकत घेऊन त्या कार्बन साठवणीच्या क्षेत्रांमध्ये रूपांतरित करत आहेत. त्यातून निर्माण झालेले कार्बन क्रेडिट विकून अब्जावधी डॉलर्सची कमाई होते. पण स्थानिक समाजाला या प्रक्रियेत काहीही हाताशी लागत नाही. उलट त्यांच्या पारंपरिक जंगलांवर, पाणवठ्यांवर आणि चराऊ जमिनींवर हक्क कमी होतो. त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया पर्यावरणीय न्यायाच्या दृष्टीने वादग्रस्त ठरते.

पर्यावरण चळवळीतील कार्यकर्त्यांनी याला 'हरित मायाजाल' असे संबोधले आहे. म्हणजेच प्रदूषण थांबवण्याऐवजी त्याचे सौंदर्यीकरण करून नफा कमावणे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही या विरोधाला महत्त्व प्राप्त झाले आहे. सुरुवातीला संयुक्त राष्ट्रसंघाने कार्बन क्रेडिट यंत्रणेवर शिक्कामोर्तब केले होते, परंतु लवकरच लक्षात आले की या बाजारात फसवेगिरी मोठ्या प्रमाणावर चालते आहे. काही प्रकल्पांत आधीपासून अस्तित्वात असलेले जंगल नव्याने दाखवले जाते आणि त्यावरून क्रेडिट मिळवले जाते. काही ठिकाणी वृक्षलागवडीचे फोटो दाखवले जातात, पण प्रत्यक्षात झाडे टिकत नाहीत.

याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या हवामान बदल मंडळाने (यूएनएफसीसीसी) कार्बन क्रेडिटसाठी कडक चौकट बनवण्यास सुरुवात केली आहे. यामागचे उद्दिष्ट म्हणजे खरोखरच प्रदूषण कमी करणारे प्रकल्प तयार केले असतील तरच क्रेडिट मिळेल. परंतु नियमनाची ही प्रक्रिया संथ गतीने चालू आहे. तोपर्यंत कार्बन क्रेडिट बाजारात अनियंत्रित व्यवहार सुरूच आहेत. भारतातील परिस्थिती थोडी वेगळी आहे. येथे जमीन ही केवळ मालमत्ता नसून सामाजिक सुरक्षा आहे. शेतकर्याच्या हातातून जमीन गेली म्हणजे त्याचे सर्वस्व गेले. त्यामुळे जेव्हा मोठे उद्योगपती किंवा मनोरंजन क्षेत्रातील नामवंत व्यक्ती शेतीजमीन विकत घेतात तेव्हा गावोगावी अस्वस्थता निर्माण होते. कागदोपत्री ते शेतकरी बनतात, परंतु प्रत्यक्षात जमीन कार्बन क्रेडिटसाठी वापरतात. यातून स्थानिक शेती संस्कृती, सामाजिक रचना आणि ग्रामीण अर्थव्यवस्था धोक्यात येते.

याचा आणखी एक परिणाम म्हणजे शेतीचे व्यापारीकरण. शेती ही परंपरेने अन्नधान्य उत्पादनासाठी केली जात होती. पण आता ती कार्बन साठवणुकीसाठी वापरली जात आहे. यातून अन्नधान्याच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. पर्यावरणशास्त्रज्ञ यावर उपाय सुचवतात. त्यांच्या मते, कार्बन क्रेडिट यंत्रणा पूर्णपणे चुकीची म्हणता येणार नाही, कारण प्रदूषण कमी करण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन आवश्यक आहे. पण ती यंत्रणा स्थानिक समाजाला न्याय देणारी असली पाहिजे. उदाहरणार्थ, जर एखाद्या गावात वृक्षलागवड प्रकल्प राबवला गेला, तर त्या गावातील लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. क्रेडिट विकून मिळणार्या पैशातून स्थानिक शाळा, दवाखाने, पाणीपुरवठा यांसाठी निधी मिळाला पाहिजे. अन्यथा हा व्यवसाय फक्त श्रीमंतांच्या खिशात पैसा ओतणारा ठरेल. याशिवाय, खरी गरज आहे ती प्रदूषण थांबवण्याची.

# कृतीतून समतेचे तत्त्वज्ञान

आज २२ सप्टेंबर रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या परिचित-अपरिचित कार्याचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला मागोवा. महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीमधील गेल्या शतकापासूनचे कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था याचे योगदान सर्वश्रुत आहे. त्याबाबत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे भाऊरावांविषयीचे विचार खूप बोलके आहेत. ते म्हणतात, 'मी विलायतेला फेरफटका मारून आलो. सारा भारत देश पायाखाली घातला. रशियाचा टॉलस्टॉय बघितला, शांतीनिकेतनातला तो जगप्रसिद्ध कवींद्र पहिला; पण भाऊराव पाटील यांच्या सारखा करुण हृदयाचा जबर गडी बघितला नाही.'

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात तर क्रांती केलीच; पण सामाजिक समता नांदावी म्हणूनही त्यांचे योगदान शब्दातीत आहे. समाजात असणारी विषमता याबाबतची जाणीव त्यांना अगदी लहानपणापासून झालेली होती. अनिष्ट गोष्टींचा विरोध करण्याची ऊर्मी त्यांना त्यांच्या लहानपणापासून होती. त्यांच्या आजोळी कुंभोज या ठिकाणी ते मामाच्या गावी राहत असताना त्यांना सत्याप्पा भोसले या एका क्रांतिकारक व्यक्तीचा सहवास लाभला होता. सत्याप्पा भोसले यांच्या धाडसाच्या कहाण्या ते खूप ऐकून होते. दीनदुबळ्या आणि असाहाय्य बायाबापड्यांना छळणार्या, त्यांच्यावर अत्याचार करणार्या मस्तवाल जमीनदार आणि सावकारांचा ते कर्दनकाळ होते.

भाऊरावांच्यामध्ये अन्यायाविरुद्ध बंड करण्याची सुरुवात अशी सत्याप्पाची गोष्ट ऐकून झाली, तर पुढे ज्ञानदेव घोलप या अस्पृश्य विद्यार्थ्याला शाळेबाहेर बसून शिक्षण घ्यावे लागते हे त्यांना बघवले नाही.त्या अस्पृश्य मुलास त्यांनी घरी आणून जेवू घातले, त्यासाठी भाऊरावांनी आईच्या हातून फुकणीने मारही खाल्ला. पुढे १९१९ मध्ये काले या गावी केशवराव बगाडे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची एक मोठी परिषद भरली होती. त्या सभेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीप्रमाणे बहुजन समाजासाठी 'रयत शिक्षण संस्था' स्थापन करण्याची घोषणा केली.

रयत शिक्षण संस्थेची उद्दिष्टे पाहिली असता लक्षात येते की सर्वसामान्य लोकांना, बहुजनांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची व्यवस्था निर्माण करावी आणि सर्व समाजातील विद्यार्थ्यांमध्ये बंधुत्वाचे नाते तयार व्हावे. महात्मा फुले यांचा समतेचा विचार भाऊरावांनी कायम कृतीमधून पुढे नेला. रयत शिक्षण संस्था चालवत असतानाही प्रतिगामी विचारांच्या अनेक प्रसंगांना कर्मवीर भाऊराव पाटील यांना सामना करावा लागला. पूर्वी सातारा जिल्ह्यात असणार्या आष्टा या गावातील काही कर्मठ आणि सनातनी लोकांनी संस्थेच्या शाळेत रुजू झालेल्या अस्पृश्य मुख्याध्यापकाची तक्रार केली. रामकृष्ण वेताळराव खैरमोडे या इंग्रजी आणि इतिहासाच्या व्यासंगी मुख्याध्यापकाची पाठराखण केली आणि आपल्या कृतीमधून संदेश दिला की रयत शिक्षण संस्था ही जातीपातीच्या पलीकडे गुणवंताची कदर करते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे दलित आणि अस्पृश्यता निवारणाचे काम पाहून महात्मा गांधीजी यांनी त्यांच्या हरिजन सेवक निधीतून दरमहा ५०० रुपयांची मदत केल्याची नोंद आहे. यावरून कर्मवीरांचे समतेच्या वाटेवरील काम लक्षात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही रयत शिक्षण संस्थेला १९२८ मध्ये भेट दिलेली होती आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी वसतिगृहाच्या शेरेबुकात नोंदवलेला अभिप्रायही खूप महत्त्वाचा आहे. ते लिहितात, 'ही एक अशी संस्था आहे की, राष्ट्र कल्याणाची काळजी वाहणार्या प्रत्येक माणसाने तिच्या उत्कर्षासाठी हातभार लावला पाहिजे.' पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९५५ साली बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री यांच्या नावे एक शाळा सुरू करण्याची घोषणा केली.

# नोकरदार महिलांमध्ये वाढतेय धूम्रपानाचे प्रमाण; ताण कमी करण्यासाठी घेतला जातोय आधार

सुमारे २०% नोकरदार महिला या कामाच्या तणावामुळे धूम्रपान करतात आणि या महिलांमध्ये भविष्यात फुफ्फुसाचा कर्करोगाचा धोका वाढतो

दर महिन्याला २५ ते ३५ वयोगटातील १० पैकी ३ नोकरदार महिला खोकल्याची तक्रार घेऊन उपचाराकरिता तज्ज्ञांची भेट घेत असल्याचे आढळून आले आहे

काय आहेत कारणे जाणून घ्या

तणाव हा नोकरदार महिलांच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनला आहे, ज्यामुळे अनेक महिला धूम्रपानासारख्या वाईट सवयींच्या आहारी जातात. सुमारे २०% नोकरदार महिला या कामाच्या तणावामुळे धूम्रपान करतात आणि या महिलांमध्ये भविष्यात फुफ्फुसाचा कर्करोगाचा धोका वाढतो. या महिलांना भविष्यात फुफ्फुसाचा कर्करोग आणि इतर दीर्घकालीन फुफ्फुसांच्या विकारांचा धोका असतो. हे टाळण्यासाठी धूम्रपानाचे व्यसन सोडणे गरजेचे आहे. जागतिक फुफ्फुस कर्करोग दिनानिमित्त तज्ज्ञांकडून महिलांना त्यांच्या फुफ्फुसांच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचे आणि धूम्रपानाचे व्यसन टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


किती आहे प्रमाण?

दर महिन्याला २५ ते ३५ वयोगटातील १० पैकी ३ नोकरदार महिला खोकल्याची तक्रार घेऊन उपचाराकरिता तज्ज्ञांची भेट घेत असल्याचे आढळून आले आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगापासून बचाव करण्यासाठी नियमितपणे उपचार आणि फॉलोअप घेणे गरजेचे आहे.

कामाचा ताण वाढत असताना धूम्रपानाचा अवलंब करणे या चिंताजनक ट्रेंडमुळे येत्या काळात फुफ्फुसाचा कर्करोग, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी), दमा आणि ब्राँकायटिस होण्याची शक्यता वाढली आहे. धूम्रपान-संबंधित फुफ्फुसांच्या समस्यांमध्ये वाढ होत असताना, वेळीच ही सवय टाळण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. वेळीच निदान व उपचार तसेच फुफ्फुसांच्या आरोग्याबाबत पुरेशी जागरूकता करण्यावर भर देणे गरजेचे आहे.

काय आहे कारण?

हल्ली कामाच्या ठिकाणी असलेली डेडलाइन, कामाचे वाढते तास, अपेक्षांचे ओझे, घर आणि ऑफीस या दोघांचे योग्य असंतुलन राखणे अशा अनेक समस्यांना महिलावर्गास तोंड द्यावे लागते. वाढत्या कामांच्या तासामुळे पुरेशी विश्रांती न मिळाल्याने ताण येऊ शकतो. शिवाय ताणतणावामुळे थकवा येणे, चिंता सतावणे, झोपेसंबंधी समस्या, डोकेदुखी, स्नायूंवर ताण येणे आणि मूड स्विंग्स सारखी लक्षणे दिसून येतात.





काही महिला तणाव कमी करण्यासाठी किंवा कामाच्या ठिकाणी सतर्क राहण्यासाठी धूम्रपानाच्या व्यसनाची निवड करू शकतात. मात्र धुम्रपान हे फुफ्फुसांना नुकसान पोहोचवते. कालांतराने, ते फुफ्फुसांच्या नाजूक अस्तरांना हानी पोहोचवते, त्यांची क्षमता कमी करते आणि श्वास घेण्यास अडचणी येतात. सिगारेटमधील हानिकारक रसायने थेट फुफ्फुसांचा कर्करोग, ब्राँकायटिस, दमा आणि क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) अशा समस्यांना आमंत्रण देत असल्याची प्रतिक्रिया अपोलो स्पेक्ट्रा, पुणे येथील इंटरनल मेडिसिन एक्स्पर्ट डॉ. आदित्य देशमुख यांनी स्पष्ट केले.

तज्ज्ञ काय सांगतात?

डॉ. देशमुख पुढे सांगतात की, कामाच्या ठिकाणी महिलांना प्रचंड ताणतणावाचा सामना करावा लागत आहे, त्यांच्यासाठी धूम्रपान हा तात्पुरता उपाय वाटू शकतो, परंतु प्रत्यक्षात ते दीर्घकालीन आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरते हे लक्षात घेणे गरजेचे आहे. सुमारे २०% नोकरदार महिला ताणतणावामुळे धूम्रपान करण्यास प्रवृत्त होतात आणि भविष्यात त्यांना फुफ्फुसाचा कर्करोग होऊ शकतो.

धूम्रपानामुळे अशा महिलांची फुफ्फुसंदेखील कमकुवत होतात. दरमहा, २५-३५ वयोगटातील १० पैकी ३ नोकरदार महिला खोकल्याची तक्रार घेऊन रुग्णालयात उपचाराकरिता येतात. धूम्रपानाचे व्यसन टाळणे हे फुफ्फुसांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरते. यामुळे शरीराच्या महत्त्वाच्या अवयवांना सुरळीतपणे ऑक्सिजनचा पुरवठा होतो, ऊर्जेची पातळी वाढते आणि फुफ्फुसांचे कार्य सुधारते. नियमित शारीरिक हालचाली, दिर्घ श्वास घेणे, हायड्रेशन आणि वार्षातून एकदा फुफ्फुसांच्या आरोग्याची तपासणी करणे गरजेचे आहे.

कोणते विकार होतात?

कामाच्या ठिकाणी येणाऱ्या सततच्या तणावामुळे सुमारे १०% नोकदार महिला या धूम्रपान करण्यास प्राधान्य देतात. कालांतराने, धूम्रपान फुफ्फुसांच्या कार्याला बाधा आणते आणि फुफ्फुसांचा कर्करोग आणि इतर श्वसन विकारांना आमंत्रण देते. दर महिन्याला २७ ते ३५ वयोगटातील १० पैकी २ महिला सतत खोकला, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास होणे यासारखी लक्षणं घेऊन उपचाराकरिता दाखल होतात.

कसा करावा उपाय?

फुफ्फुसांच्या कर्करोगाचे निदान छातीच्या एक्स-रे आणि सीटी स्कॅनद्वारे केले जाऊ शकते, त्यानंतर कर्करोगाच्या पेशींची उपस्थिती निश्चित करण्यासाठी बायोप्सी केली जाते. निदान निश्चित झाल्यानंतर उपचार हे कर्करोगाच्या टप्प्यावर अवलंबून असतात आणि त्यात शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिएशन थेरपी, टार्गेट्ड थेरपी किंवा या सर्वांचा समावेश असू शकतो.

धूम्रपानाची सवय सोडणे, घरातील प्रदूषण कमी करणे, पुरक आहार घेणे आणि योगा किंवा मेडिटेशन सारख्या तणाव व्यवस्थापन तंत्रांमुळे फुफ्फुसांच्या कर्करोगाची शक्यता कमी होऊ शकते, अशी प्रतिक्रिया डॉ. ज्योती मेहता, रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट, ऑन्को-लाइफ कॅन्सर सेंटर, तळेगाव यांनी व्यक्त केली.

## हार्ट अटॅक येण्याच्या आठवडाभर आधी महिलांच्या शरीरात दिसून येतात ‘हे’ महाभयानक बदल, दुर्लक्ष केल्यास ओढावेल मृत्यू



जगभरात हृदयविकाराने मृत्यू होणाऱ्या लोकांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. जीवनशैलीतील बदल, कामाचा वाढलेला तणाव, आहारात होणारे बदल, धूम्रपान इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर दिसून येत आहे. शरीरात जमा झालेले घाणेरडे कोलेस्ट्रॉल हृदयाच्या रक्तवाहिन्या पूर्णपणे ब्लॉक करून टाकतो. ज्यामुळे रक्तप्रवाहात आणि ऑक्सिजन पुरवठ्यात अनेक अडथळे निर्माण होतात. हार्ट ब्लॉकेज, हार्ट अटॅक किंवा हृद्यासंबंधित कोणत्याही समस्या उद्भवू लागल्यानंतर अनेक लोक दुर्लक्ष करतात. महिला आणि पुरुषांमध्ये हार्ट अटॅकची वेगवेगळी लक्षणे दिसून येतात. सतत काम आणि कुटुंबाच्या जबाबदारीमुळे महिला स्वतःच्या आरोग्याकडे नेहमीच दुर्लक्ष करत असतात. पण असे न करता आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे महिला आरोग्यासंबंधित समस्या उद्भवू लागल्यानंतर अनेक वेगवेगळे चुकीचे अर्थ काढतात. ज्यामुळे योग्य वेळी आजाराचे निदान होत नाही. महिलांमध्ये हार्ट अटॅकची अतिशय सामान्य लक्षणे दिसून येतात. या लक्षणांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला महिलांना हार्ट अटॅक येण्याच्या आठवडाभर आधी शरीरात कोणती लक्षणे दिसून येतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. ही लक्षणे दिसताच तात्काळ डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करावे.

छातीमध्ये वाढलेली अस्वस्थता:

छातीमध्ये दुखण्यास सुरुवात झाल्यानंतर बऱ्याचदा दुर्लक्ष केले जाते. ॲसिडिटी किंवा अपचनाची समस्या समजून दुर्लक्ष करतात. पण असे न करता डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार करावे. छातीमध्ये वेदना वाढणे, छाती भरून आल्यासारखे वाटणे, छातीवर दाब आल्यासारखे वाटणे, घट्टपणा जाणवणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात.

सतत थकवा जाणवणे:

मानवी शरीरात थकवा येणे ही अतिशय सामान्य समस्या आहे. पण हार्ट अटॅक येण्याच्या काही दिवसआधी वेगवेगळ्या प्रकारचा थकवा जाणवू लागतो. थोडस काम केल्यानंतर लगेच थकून जाणे, सतत अशक्तपणा, थोडस चालल्यानंतर लगेच दम लागणे इत्यादी लक्षणे दिसू लागल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला देतात. महिलांना हार्ट अटॅक येण्याआधी शरीरात सतत थकवा जाणवू लागतो.

मळमळ किंवा थंड घाम सुटणे:

महिलांना हार्ट अटॅक येण्याच्या काही दिवस आधी अपचन, मळमळ, उलटी, पोट फुगणे इत्यादी पचनसंबंधित समस्या उद्भवू लागतात. या समस्या वाढू लागल्यानंतर लिंबू पाणी किंवा थंड पेयांचे सेवन केले जाते. तर काहींना अचानक घाम येणे, चक्कर येणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे शरीरात दिसणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता आरोग्याची योग्य काळजी घ्यावी.

(संबंधित प्रश्न)

हृदयविकाराचा झटका म्हणजे काय?

हृदयविकाराचा झटका, ज्याला वैद्यकीय भाषेत मायोकार्डियल इन्फ्रक्शन (चूेलरीवळरश्र ळपषरीलींळेप) म्हणतात, तेव्हा येतो जेव्हा हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्यांमध्ये अडथळा येतो. यामुळे हृदयाच्या स्नायूंना पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि ते होतात किंवा मरतात.

हृदयविकाराचा झटका आल्यास काय करावे?

तत्काळ आपत्कालीन वैद्यकीय मदत मिळवा.१०८, १०२ किंवा ११२ यांसारख्या आपत्कालीन क्रमांकांवर कॉल करा.डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही औषधे घेऊ नका.

हृदयविकाराचा झटका टाळण्यासाठी काय करावे?

नियमित व्यायाम करा, संतुलित आहार घ्या, धूम्रपान आणि मद्यपान टाळा, तणावाचे व्यवस्थापन करा, नियमित आरोग्य तपासणी करा.

## शरीरातील ऊर्जा कायम टिकून ठेवण्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा मावा लस्सी, नोट करून घ्या चविष्ट पदार्थ

श्रावण महिन्यात केलेला उपवासाचा आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. त्यामुळे उपवासाच्या दिवसांमध्ये कायमच हेल्दी पदार्थ खावेत. तसेच उपवास केल्यानंतर भरपूर पाण्याचे सेवन करावे. पाणी प्यायल्यामुळे शरीर हायड्रेट राहते. पण बऱ्याचदा उपवासाच्या दिवशी काहीच न खाल्यामुळे शरीरात थकवा, अशक्तपणा जाणवू लागतो. संपूर्ण शरीर डिहायड्रेट होऊन जाते. उपवासाच्या दिवशी साबुदाणा खिचडी, वरीचा भात, साबुदाणा वडा इत्यादी तेलकट पदार्थ बनवले जातात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये मावा लस्सी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. उपवास केल्यानंतर अनेक लोक लस्सी पितात. लस्सीचे नाव ऐकल्यानंतर सगळ्यांच्या तोंडाला पाणी सुटते. एक ग्लास लस्सीचे सेवन केल्यामुळे शरीरात दीर्घकाळ ऊर्जा टिकून राहते. चला तर जाणून घेऊया मावा लस्सी बनवण्याची सोपी रेसिपी.





साहित्य:

दही

साखर

मावा

बर्फाचे तुकडे

वेलची पावडर

काजू बदाम तुकडे

कृती: मावा लस्सी बनवण्यासाठी सर्वप्रथम, मिक्सरच्या भांड्यात दही घेऊन त्यात आवश्यकतेनुसार साखर घालून मिक्सरमधून पेस्ट तयार करा.

त्यानंतर त्यात मावा टाकून पुन्हा एकदा बारीक वाटून घ्या.

तयार केलेल्या लस्सीमध्ये वेलची पावडर टाकून पुन्हा एकदा मिक्स करा. काचेच्या ग्लासात बर्फाचे खड्डे टाका.

वरून तयार केलेली लस्सी टाकून वरून सजावटीसाठी काजू बदामचे तुकडे टाकून लस्सी सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली मावा लस्सी. एक ग्लास प्यायल्यामुळे शरीराला ऊर्जा मिळेल.

## उपवासाच्या दिवशी शरीरातील कमी झालेली ऊर्जा वाढवण्यासाठी नाश्त्यात बनवा रताळ्याचा किस, नोट करून घ्या रेसिपी

आज श्रावण महिन्यातील दुसरा सोमवार आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारी महिला उपवास करतात. उपवास करून शंकराची मनोभावे पूजा केली जाते. याशिवाय या महिन्यात अनेक घरांमध्ये पूजापाठ, व्रत, शांती इत्यादी अनेक धार्मिक सोहळे असतात. उपवासाच्या दिवशी बराच वेळ कोणत्याही पदार्थांचे सेवन न केल्यामुळे शरीरातील ऊर्जा काहीशी कमी होऊन जाते. सतत थकवा, अशक्तपणा जाणवू लागतो. अशावेळी शरीरातील ऊर्जा वाढवण्यासाठी पौष्टिक आणि हेल्दी पदार्थांचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये रताळ्याचा किस बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. या पद्धतीने बनवलेला रताळ्याचा किस चवीला अतिशय सुंदर लागतो. याशिवाय वाढलेले वजन कमी करतानासुद्धा रताळ्याचे सेवन केले जाते. चला तर जाणून घेऊया रताळ्याचा किस बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

रताळी

शेंगदाण्याचा कूट

जिरं


तूप


हिरवी मिरची

ओल खोबर

कृती:

रताळ्याचा किस बनवण्यासाठी रताळी स्वच्छ पाण्याने धुवून घ्या. त्यानंतर रताळ्याच्या वरील साल काढा आणि रताळी किसून घ्या.





कढईमध्ये तूप गरम करून त्यात जिरं आणि बारीक चिरून घेतलेली हिरवी मिरची टाकून भाजा.

नंतर त्यात किसून घेतलेला रताळ्याचा किस टाकून मिक्स करा. सर्व पदार्थ मिक्स झाल्यानंतर त्यात चवीनुसार मीठ टाकून ५ मिनिटं रताळी वाफेवर शिजवून घ्या.

त्यानंतर त्यात शेंगदाण्याचा कूट आणि थोडीशी साखर टाकून व्यवस्थित मिक्स करा.

सगळ्यात शेवटी रताळी व्यवस्थित शिजल्यानंतर त्यात ओल्या खोबऱ्याचा किस टाकून मिक्स करून घ्या. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला रताळ्याचा किस. हा पदार्थ उपवासाच्या दिवशी शरीराची ऊर्जा वाढवेल.

## कोरियन महिलांप्रमाणे सिल्की केस हवे आहेत? मग ‘या’ पद्धतीने करा तांदळाच्या पाण्याचा वापर, केसांना होतील भरमसाट फायदे

हल्ली धूळ, माती, प्रदूषणामुळे आरोग्यासोबतच त्वचा आणि केसांच्या समस्या वाढू लागल्या आहेत. केस गळणे, केसांमध्ये कोंडा वाढणे, केस अचानक तुटणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागल्या आहेत. बऱ्याचदा केसांसंबधित समस्या उद्भवू लागल्यानंतर अनेक लोक दुर्लक्ष करतात. पण सतत दुर्लक्ष केल्यामुळे केसांच्या समस्या आणखीनच वाढत जातात. केस गळण्यास सुरुवात झाल्यानंतर महिला बाजारात उपलब्ध असलेल्या महागड्या हेअर केअर प्रॉडक्टचा वापर, गोळ्या औषध, महागड्या ट्रीटमेंट, वेगवेगळे शॅम्पू इत्यादी अनेक गोष्टींचा वापर करतात. मात्र तरीसुद्धा केसांच्या समस्या कमी होतात. सोशल मीडियावर मागील अनेक काही दिवसांपासून कोरियन प्रॉडक्टची मोठी क्रेझ वाढली आहे.

कोरियन स्किन केअर, कोरियन हेअर केअर प्रॉडक्ट मोठ्या प्रमाणावर बाजारात उपलब्ध झाले आहेत. कोरियन महिलांप्रमाणे सुंदर आणि सिल्की केस मिळवण्यासाठी महिला सतत काहींना काही करत असतात. वेगवेगळे उपाय करण्याऐवजी तांदळाच्या पाण्याचा वापर करावा. तांदळाच्या पाण्याचा योग्य पद्धतीने वापर केल्या केस अतिशय चमकदार आणि सुंदर दिसतील. तांदळाचे पाणी केसांसाठी नॅचरल क्लिंझर म्हणून सुद्धा वापरले जाते. आज आम्ही तुम्हाला केसांच्या वाढीसाठी तांदळाच्या पाण्याचा कशा पद्धतीने वापर करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.



तांदळाचे पाणी केसांवर लावताना महिला अनेक चुका करतात. या चुकांमुळे केस चांगले होण्याऐवजी आणखीनच खराब होऊन जातात. केसांच्या मुळांना हानी पोहचते. वारंवार तांदळाचे पाणी केसांवर लावल्यामुळे टाळूवर खाज सुटण्याची शक्यता असते. टाळूवर सतत येणाऱ्या खाजेमुळे इन्फेक्शनचा धोका वाढू लागतो. त्यामुळे कोणतेही घरगुती उपाय करताना चुकीच्या पद्धतींचा वापर करू नये. तांदळाच्या पाण्यात इनोसिटॉल, अमीनो ॲसिड आणि इतर जीवनसत्वे आढळून येतात. ज्यामुळे कोरडे आणि रुक्ष झालेले केस मऊ होण्यास मदत होते.

केसांमध्ये वाढलेले कोंडा कमी करण्यासाठी तांदळाच्या पाण्याचा वापर करावा. याशिवाय टाळूवर वाढलेली जळजळ कमी करण्यासाठी तांदळाचे पाणी प्रभावी ठरते. तांदळाच्या पाण्याचा योग्य पद्धतीने वापर केल्यास केसांच्या अनेक समस्यांपासून सुटका मिळेल.केसांची खुंटलेली वाढ होऊन केस मजबूत आणि चमकदार दिसू लागतील.

तांदळाचे पाणी लावण्याची सोपी पद्धत:

तांदळाचे पाणी तयार करताना अर्धा वाटी तांदूळ पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर मोठ्या भांड्यात पाणी आणि तांदूळ भिजत ठेवा. रात्रभर तांदूळ पाण्यात व्यवस्थित भिजल्यानंतर सकाळी पाणी गाळून केसांवर लावा. काहीवेळ ठेवून नंतर केस पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. हा उपाय केल्यामुळे केसांची वाढ होण्यास मदत होईल आणि केस सुंदर, चमकदार दिसू लागतील.

# खाजगी अभियंत्यामार्फत देणार बांधकाम परवाना



लातूर /प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिका हद्दीमध्ये खाजगी अभियंत्यामार्फत भूखंडावर बांधकाम परवाना देण्याची तरतूद करण्यात आली आहे.मंगळवारी (दि. २३) मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, सहाय्यक संचालक नगर रचना अनिकेत महाजन,क्रेडाइचे अध्यक्ष उदय पाटील यांच्यासह मनपा येथे नोंदणीकृत असणाऱ्या अभियंत्यांची उपस्थिती होती.

लो रिस्क अंतर्गत अर्जदारांना ऋ+२ बांधकाम परवाना खाजगी अभियंत्यामार्फत देता येईल. १५० स्क्वेअर मीटरच्या मर्यादेत हा परवाना असेल. मंजूर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० अंतर्गत ही परवानगी असणार आहे. अनधिकृत कामे टाळण्यासाठी तसेच या संदर्भात भविष्यात तक्रार आली किंवा अनधिकृत बांधकाम केले तर संबंधित खाजगी अभियंता व अर्जदाराचे व्यावसायिक परवाने रद्द करून कायदेशीर कारवाई करण्याची तरतूदही यात आहे.

या बैठकीत गुंठेवारी संदर्भातही चर्चा झाली. गुंठेवारी नियमित सुरू करण्यात यावी असा प्रस्ताव खाजगी अभियंत्यामार्फत देण्यात आला.गुंठेवारी नियमितीकरण अंतर्गत भूखंड व बांधकाम हे नियमित करण्याचे प्रस्ताव मांडण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने भूखंड व बांधकाम २०२० च्या अगोदर झालेले असणे आवश्यक आहे. अधिक बांधकाम असणाऱ्या प्रस्तावामध्ये गुंठेवारी अधिनियम २००१ च्या अनुषंगाने शुल्क आकारणी करण्यात येणार आहे.

## लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाचा दिलासा; ऑगस्टमध्ये अतिवृष्टी, पुरामुळे झालेल्या नुकसानीपोटी २४४ कोटींची मदत जाहीर

लातूर :- जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे जवळपास २ लाख ८७ हजार १५१ हेक्टर क्षेत्रातील शेतपिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीचे पंचनामे करून त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला होता. आज राज्य शासनाने लातूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त ३ लक्ष ८० हजार ५११ शेतकऱ्यांना २४४ कोटी ३५ लक्ष रुपयांची मदत जाहीर करून दिलासा दिला आहे. राज्य शासनाने घोषित केलेली मदतीची रक्कम डीबीटी पोर्टलद्वारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये, यासाठी जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, असे निर्देशही शासनाने दिले आहेत. त्यानुसार प्रशासनाकडून तातडीने कार्यवाही केली जाणार आहे. जिल्हा प्रशासनाने ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे जिल्ह्यातील खरीप पिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर केला होता. त्यानुसार लातूर तालुक्यातील ३० हजार २६५ शेतकऱ्यांना २१ कोटी ८१ लाख ५४ हजार रुपये, औसा तालुक्यातील ४६ हजार १८३ शेतकऱ्यांना ३१ कोटी ७५ हजार ८४ हजार रुपये, रेणापूर तालुक्यातील ४५ हजार ७७८ शेतकऱ्यांना २४ कोटी ७२ लक्ष ९९ हजार रुपये, निलंगा तालुक्यातील २७ हजार ७५८ शेतकऱ्यांना २१ कोटी २१ लक्ष ४१ हजार रुपये, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील २४ हजार ८७ शेतकऱ्यांना १६ कोटी १९ लाख ८ हजार रुपये, देवणी तालुक्यातील २६ हजार ९७४ शेतकऱ्यांना १८ कोटी ९९ लक्ष ४१ हजार रुपये, उदगीर तालुक्यातील ५२ हजार ७८३ शेतकऱ्यांना ३० कोटी ६९ लक्ष ४४ हजार रुपये, जळकोट तालुक्यातील २० हजार ७०० रुपये शेतकऱ्यांना १३ कोटी २६ लक्ष १७ हजार रुपये, अहमदपूर तालुक्यातील ५७ हजार ७३७ शेतकऱ्यांना ३६ कोटी ४६ लक्ष ८६ हजार रुपये आणि चाकूर तालुक्यातील ४८ हजार २४६ शेतकऱ्यांना २९ कोटी २२ लक्ष ३० हजार रुपये रुपये मदत जाहीर करण्यात आली आहे.

# कानपूर पोलिसांच्या विरोधात केज येथे मुस्लिम समाजाचा तहसील कार्यालयावर मोर्चा





केज/प्रतिनिधी केज येथील मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने उत्तर प्रदेशातील कानपूर येथील पोलिसांच्या विरोधात केज तहसील कार्यालयावर मोर्चा काढून तहसीलदार राकेश गिड्डे यांना मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने लेखी निवेदन देण्यात आले. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, उत्तर प्रदेशातील कानपूर येथे ईद-ए-मिलादुन्नबी च्या मिरवणुकी दरम्यान काही युवकांनी आय लव्ह महंमद असे फलक घेतले होते. ही कृती पूर्णपणे निरपराध असून ती फक्त धर्माविषयी श्रद्धा व प्रेम व्यक्त करणारी होती. मात्र त्या ठिकाणच्या काही युवकांवर कानपूर पोलिसांनी अन्यायाने गुन्हे दाखल केले आहेत. सदर घटना अत्यंत दुर्दैवी व लोकशाही विरोधी आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्मानुसार श्रद्धा व्यक्त करण्याचा हक्क दिला आहे. तरी देखील पोलिसांकडून अशा निर्दोष कृतिवर कारवाई करणे हे धार्मिक स्वतंत्र्यावर प्रहार करणारे आहे. त्यामुळे कानपूर येथील संबंधित पोलिसांवर तात्काळ कठोर कारवाई करून त्यांना सेवेतून काढण्यात यावे, त्यांच्या विरुद्ध देशद्रोहासह योग्य तो कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा, ज्या युवकांवर खोटे गुन्हे दाखल झालेले आहेत ते तातडीने मागे घेऊन रद्द करण्यात यावेत, मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याबद्दल संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात यावेत, भविष्यामध्ये कोणत्याही धार्मिक मिरवणुकी दरम्यान अन्यायकारक कारवाई होऊ नये, यासाठी शासनाने स्पष्ट आदेश व मार्गदर्शक तत्वे काढावीत, मुस्लिम समाजावर वारंवार होणारे अन्याय, अत्याचार, खोटे गुन्हे व धार्मिक अपमान रोखण्यासाठी विशेष संरक्षण कायदा लागू करण्यात यावा, मोब लिंचिंग, धार्मिक व्देष पसरविणे व समाजकंटकांची उचकावणी यावर आळा घालण्यासाठी स्वतंत्र तपास यंत्रणा स्थापन करण्यात यावी, संबंधित दोषी पोलिसांवर एफ. आय.आर. दाखल करून चौकशी न्यायालयीन देखरेखित करण्यात यावी. त्याचबरोबर सदर प्रकारा हा फक्त श्रद्धा आणि धार्मिक प्रेम व्यक्त करणाऱ्या मुस्लिम तरुणांवर अन्यायाने केलेली कारवाई आहे. म्हणून योग्य ती कायदेशीर कारवाई करून मुस्लिम समाजाला न्याय देण्यात यावा या मागणीचे लेखी निवेदन तहसीलदार केज यांना केज येथील मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने देण्यात आले आहे. सदर मागणीचे लेखी निवेदन तहसीलदार राकेश गिड्डे यांनी स्वीकारले आहे. या लेखी निवेदनावर हाफीज सलिमसाब खुरेशी, हाफीज मुखीमसाब खतीब, हाफीज अमरसाब शेख, हाफीज जहिरोद्दिन इनामदार, हारुणभाई इनामदार,तालेब इनामदार, अर्षद शेख, सय्यद अजीम, शाकेर कुरेशी, रईस शेख यांच्यासह धर्मगुरु व समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी माध्यमांशी बोलताना धर्मगुरु यांनी सांगितले की, सतत आमच्या मुस्लिम समाज बांधवांवर अन्याय होत आहे आम्ही मुस्लिम समाज बांधव महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानत आहोत. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय संविधानाच्या चौकटीमध्ये राहून आम्ही न्याय मागत आहोत. कानपूर येथील घटना ही द्वेषातून केलेली आहे त्याचा आम्ही जाहीर निषेध व्यक्त करतो. जर प्रशासनाने आमच्या मागण्याची तात्काळ दखल न घेतल्यास यापुढे आम्ही वेगवेगळ्या प्रकारचे जनआंदोलना छेडणार आहोत. आमच्या मुस्लिम समाज बांधवांवर जर असाच अन्याय होत राहिला तर आम्ही रस्त्यावर उतरून रस्त्यावरची लढाई ही लढण्यास तयार आहोत असा प्रशासनाला इशारा देखील देण्यात आलेला आहे.

# बीड जिल्ह्यात अतिवृष्टीने घातला धुमाकूळ

### केज तालुक्यातील येवता शिवारात ढगफुटीसद्रश्य ग्रामविकास अधिकारी व तलाठी यांनी केले पंचनामे



केज/प्रतिनिधी गेल्या अनेक दिवसापासून बीड जिल्ह्यात अतिवृष्टीने धुमाकूळ घातला असून केज तालुक्यातील येवता शिवारात ढगफुटीसद्रस्य चित्र झाल्याने सर्व काढणीस आलेली सोयाबीन पाण्याखाली गेली आहे व आता काढणीसाठी शेतात जात येत नाही त्यामुळे शेतकऱ्यांना शासनाने पन्नास हजार रुपये हेक्टरी अनुदान जाहीर करावे अशी शेतकऱ्यांतून मागणी जोर धरत आहे. शेतकऱ्यांनी केलेला वार्षिक खर्च पाण्यात गेला आहे यामुळे शासनाने तात्काळ शेतकऱ्यांना अनुदान जाहीर करावे अशा प्रतिक्रिया शेतकऱ्यांतून ऐकावयास येत आहे गेल्या अनेक दिवसांपासून पाऊस उघडण्याचे नाव घेत नाही दररोज पाऊस चालू असल्याने हातात आलेले सोयाबीनचे पीक आज डोळ्यासमोर पाण्यात जाताना दिसत आहे यावेळी येवता सज्जाचे तलाठी घुले साहेब व ग्रामविकास अधिकारी सोनवणे साहेब यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली असता ग्रामविकास अधिकारी यांनासुद्धा गहिवरून आले की, काढणीस आलेले पीक आज शेतकऱ्याच्या हातचे जात आहे. यामुळे शासनाने सरसकट अनुदान जाहीर करावे अशी शेतकऱ्यातून मागणी जोर धरत आहे व असे न झाल्यास शेतकरी आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचेही बोलले जात आहे. यावेळी ग्रामविकास अधिकारी तलाठी व ग्रामस्थ यांनी येवता शिवारात शेतकऱ्याच्या थेट शेतात शिरून पंचनामा केला यावेळी शेतकऱ्यांच्या शेतातील गुडघाभर पाण्यात शिरून शेतातील शेवाळलेल्या जमिनीची पाहणी केली यावेळी शेतात जर शेवाळ येत असेल तर किती दिवसापासून या शेतात पाणी साचलेले आहे याचा अंदाज यावरून येत आहे की सतत १५ ते २० दिवस या शेतात पाणी पाणी साचलेल्या यामुळे शेतातील पीक ४० टक्के पेक्षा अधिक सोयाबीन सह इतर पिकांचे नुकसान झालेले आहे असे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशा प्रतिक्रिया जनतेतून येत आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाउपाध्यक्षपदी प्रितम खरात यांची निवड झाल्याबद्दल सत्कार संपन्न




केज/प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाउपाध्यक्षपदी प्रितम खरात यांची निवड झाल्याबद्दल मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या केज तालुका उपाध्यक्षपदी प्रितम खरात यांची निवड करण्यात आली आहे. सामाजिक, राजकीय बांधिलकी जोपासणारे मनमिळाऊ सर्वांना सोबत घेत चालणारे प्रितम खरात यांची पक्षांचे प्रदेशाध्यक्ष खा,सुनिल तटकरे व मा.मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या सुचनेनुसार केज तालुका उपाध्यक्षपदी प्रितम खरात यांची निवड करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या विचारानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातून आपली एकनिष्ठता तसेच आपल्या आचरण विचारद्वरे समाजात पद प्रतिष्ठेची जपवणुक व जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यास आपण आग्रही रहाताल आसे बीड जिल्ह्याचे अध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी निवडी दरम्यान बोलताना सांगितले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार यांच्या पक्षाच्या केज तालुका उपाध्यक्षपदी प्रीतम खरात यांची निवड झाल्याबद्दल मित्रपरिवाराच्यावतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा सरचिटणीस डॉ.उत्तम खोडसे, पत्रकार दशरथ चवरे, तात्या गवळी, ड. निखिल बचुटे, मंगेश देशमुख, धीरज कुचेकर इत्यादी उपस्थित होते.

## २६ सप्टेंबर रोजी क्रांतिनगर भागातील नागरिकांचे रस्ता रोको आंदोलन झोपडपट्टी हक्क संघर्ष समितीच्या वतीने तहसीलदारांना विविध मागण्यासंदर्भात निवेदन सादर



केज/प्रतिनिधी दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी क्रांतिनगर भागातील नागरिक हे विविध मागणी संदर्भात रस्ता रोको आंदोलन करणार आहेत असा इशारा प्रशासनाला देण्यात आलेला आहे.झोपडपट्टी हक्क संघर्ष समितीच्या वतीने तहसीलदारांना विविध मागण्यासंदर्भात निवेदन तहसीलदार केज यांना झोपडपट्टी हक्क संघर्ष समितीच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनामध्ये क्रांतीनगर, कानडी रोड येथे १९८३-१९८४ पासून शासनाने ९१ व ९५ असे १८६ घरे निराधार, भूमिहीन, बेघर, अनुसूचित जाती जमाती, भटक्या विमुक्त जाती जमाती, अल्पसंख्यांक लोकांना एक गुंठा जागा व पाच पत्रांचे घरकुल बांधून वाटप करून कबाले पत्रक म्हणजेच मालकी हक्क दिलेला होता परंतु गेल्या ४० वर्षात कुटुंबातील संख्या वाढल्याने क्रांतीनगर वसाहतीत पाचशे ते सहाशे घरे झालेले आहेत. तरी कुटुंब संख्या वाढल्याने दीड ते दोन गुंठे जागा देऊन मालकी हक्क देण्यात यावा,तसेच सर्व नागरी सुविधा या झोपडपट्टी धारकांना देण्यात याव्यात, यासाठी सदरील निवेदन सादर करण्यात आले. क्रांतीनगर येथील विठ्ठल मंदिर, महात्मा फुले सभागृह, सत्यशोधक अण्णाभाऊ साठे सभागृह, अंगणवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह यांची जागा मोजून नगरपंचायत केज अभिलेखात नोंद करण्यात यावी. वरील सर्व सभागृह, शाळा व अंगणवाडी यांची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी. यश कंट्रक्शन कंपनीने अपूर्ण ठेवलेले काम तात्काळ करण्यात यावे. क्रांतीनगर वसाहतीत जुने रस्ते व नाल्या तात्काळ दुरुस्त करण्यात याव्यात, तसेच मुस्लिम समुदायाकरिता कब्रस्तानासाठी जागा देण्यात यावी, नवीन पाईपलाईन टाकून पिण्याच्या पाण्याची सोय करावी. वसंत महाविद्यालयासमोर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, रमाई घरकुल योजना व पंतप्रधान आवास योजना या घरकुल योजनेतील पहिला व दुसरा हप्ता तात्काळ देण्यात यावा, अपंग, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना नागरिकांची केवायसी होत नसल्याने पर्यायी व्यवस्था करून बंद झालेल्या पगारी पुन्हा सुरू करण्यात याव्यात. तसेच क्रांतीनगर येथे मंजूर असलेले स्वस्त धान्य दुकान क्रांतीनगर भागातच सुरू करण्यात यावे. याकरिता जिल्हाधिकारी बीड, उपजिल्हाधिकारी आंबेजोगाई, तहसीलदार केज तसेच मुख्याधिकारी स नगरपंचायत कार्यालय केज,पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांना माहितीस्तव सादर करण्यात आले. सदरील निवेदनावर बाबुराव गालफाडे,लक्ष्मण जाधव, इरफान पठाण, अनिल लोखंडे, सय्यद शकील, शितलताई लांडगे, योगेश गायकवाड, अजय गालफाडे, आरेफ खुरेशी, नागेश जावळे, भीमा हजारे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अतिवृष्टीमुळे केज तालुक्यातील मांजरा नदीकाठाच्या काही गावांचा संपर्क तुटला

**केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी सकाळी राजेगाव बोरगाव सह मांजरा नदी काठांच्या गावांना भेट देऊन येथे जाऊन पाहणे केली.**

भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा,शिवसंग्रामचे प्रदेशाध्यक्ष प्रभाकर आप्पा कोलंगडे भाजपचे जिल्हा सचिव सुनील आबा गलांडे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी यांनी मांजरा नदीकाठच्या गावांना भेटी देऊन पाहणी केली.




केज/प्रतिनिधी अतिवृष्टी पावसामुळे केज तालुक्यातील मांजरा नदी काटाच्या गावामध्ये पावसाचे पाणी घुसले असल्यामुळे काही गावांचा संपर्क तुटला असून शेतकरी व नागरिक अडचणीत सापडले आहेत केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी स्वतः नदीकाठच्या गावांना भेटी देऊन प्रत्यक्षात पाहणी केली आहे तर काही पक्षाच्या लोकप्रतिनिधी यांनीही या गावांना भेटी देऊन पाहणी करून शेतकरी व नागरिकांना आधार देण्याचे काम करत आहेत. मागील तीन चार दिवसांपासून सतत जोरदार झालेल्या अतिवृष्टी पावसामुळे मांजरा नदीला आलेल्या पुराचे पाणी राजेगाव बोरगाव मांजरा नदीकाठच्या गावांमध्ये शिरल्यामुळे या गावातील हजारो एकर जमीन पाण्याखाली वाहून गेली आहे त्यामधील ठिकाणचे अतोनात सोयाबीन सह इतर पिकाचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर अनेक शेतकऱ्यांचे पशुंचे सुद्धा नुकसान झाले आहे. शेतीमध्ये उभारलेले सोलार पंपाचे पॅनल, सोयाबीन,ऊस, कापूस, फळबाग यासह इतर पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झालेले आहे शेतकऱ्यांच्या हाताशी आलेला घास हा अतिवृष्टीमुळे हिरावून घेतला आहे शेतकरी हे सध्या अडचणीत सापडले आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेली आहे त्याचबरोबरमांजरा नदी काठांच्या काही गावांमध्ये पाणी शिरल्यामुळे अनेक नागरिकांच्या घरात पाणी घुसल्यामुळे अनेकांच्या घरातील संसार उपयोगी साहित्याची सुद्धा नुकसान मोठ्या प्रमाणात झालेली आहे त्यामुळे शासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात व तातडीची मदत शेतकऱ्यांना देण्यात यावी अशी मागणी येथील नागरिकांमधून होत आहे

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE